Vol 6 Issue 11 May 2017

ISSN No :2231-5063

# International Multidisciplinary Research Journal

# *Golden Research Thoughts*

Chief Editor
Dr.Tukaram Narayan Shinde

Publisher
Mrs.Laxmi Ashok Yakkaldevi

Associate Editor
Dr.Rajani Dalvi

Honorary
Mr.Ashok Yakkaldevi

**Welcome to GRT**

**RNI MAHMUL/2011/38595** **ISSN No.2231-5063**

Golden Research Thoughts Journal is a multidisciplinary research journal, published monthly in English, Hindi & Marathi Language. All research papers submitted to the journal will be double - blind peer reviewed referred by members of the editorial board.Readers will include investigator in universities, research institutes government and industry with research interest in the general subjects.

## Regional Editor

Manichander Thammishetty
Ph.d Research Scholar, Faculty of Education IASE, Osmania University, Hyderabad

## *International Advisory Board*

Kamani Perera
Regional Center For Strategic Studies, Sri Lanka

Janaki Sinnasamy
Librarian, University of Malaya

Romona Mihaila
Spiru Haret University, Romania

Delia Serbescu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Anurag Misra
DBS College, Kanpur

Titus PopPhD, Partium Christian University, Oradea,Romania

Mohammad Hailat
Dept. of Mathematical Sciences, University of South Carolina Aiken

Abdullah Sabbagh
Engineering Studies, Sydney

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Loredana Bosca
Spiru Haret University, Romania

Fabricio Moraes de Almeida
Federal University of Rondonia, Brazil

George - Calin SERITAN
Faculty of Philosophy and Socio-Political Sciences Al. I. Cuza University, Iasi

Hasan Baktir
English Language and Literature Department, Kayseri

Ghayoor Abbas Chotana
Dept of Chemistry, Lahore University of Management Sciences[PK]

Anna Maria Constantinovici
AL. I. Cuza University, Romania

Ilie Pintea,
Spiru Haret University, Romania

Xiaohua Yang
PhD, USA

......More

## *Editorial Board*

Pratap Vyamktrao Naikwade
ASP College Devrukh,Ratnagiri,MS India

R. R. Patil
Head Geology Department Solapur University,Solapur

Rama Bhosale
Prin. and Jt. Director Higher Education, Panvel

Salve R. N.
Department of Sociology, Shivaji University,Kolhapur

Govind P. Shinde
Bharati Vidyapeeth School of Distance Education Center, Navi Mumbai

Chakane Sanjay Dnyaneshwar
Arts, Science & Commerce College, Indapur, Pune

Awadhesh Kumar Shirotriya
Secretary,Play India Play,Meerut(U.P.)

Iresh Swami
Ex - VC. Solapur University, Solapur

N.S. Dhaygude
Ex. Prin. Dayanand College, Solapur

Narendra Kadu
Jt. Director Higher Education, Pune

K. M. Bhandarkar
Praful Patel College of Education, Gondia

Sonal Singh
Vikram University, Ujjain

G. P. Patankar
S. D. M. Degree College, Honavar, Karnataka

Maj. S. Bakhtiar Choudhary
Director,Hyderabad AP India.

S.Parvathi Devi
Ph.D.-University of Allahabad

Sonal Singh,
Vikram University, Ujjain

Rajendra Shendge
Director, B.C.U.D. Solapur University, Solapur

R. R. Yalikar
Director Managment Institute, Solapur

Umesh Rajderkar
Head Humanities & Social Science YCMOU,Nashik

S. R. Pandya
Head Education Dept. Mumbai University, Mumbai

Alka Darshan Shrivastava
Shaskiya Snatkottar Mahavidyalaya, Dhar

Rahul Shriram Sudke
Devi Ahilya Vishwavidyalaya, Indore

S.KANNAN
Annamalai University,TN

Satish Kumar Kalhotra
Maulana Azad National Urdu University

**Address:-Ashok Yakkaldevi 258/34, Raviwar Peth, Solapur - 413 005 Maharashtra, India**
**Cell : 9595 359 435, Ph No: 02172372010 Email: ayisrj@yahoo.in Website: www.aygrt.isrj.org**

ISSN: 2231-5063 IMPACT FACTOR : 4.6052(UIF) VOLUME - 6 | ISSUE - 11 | MAY - 2017

GRT GOLDEN RESEARCH THOUGHTS

# परळी येथील वैजनाथ मंदिर : एक वास्तूशिल्पीय अध्ययन

प्रा. चव्हाण मारोती पोमा
M.A. M.ed. P.Phil. Ph.D. SLET.

## प्रस्तावना :–

भारतातील वास्तू आणि वास्तुनिर्मिती तंत्रामध्ये वैविध्य जाणवते. त्याचा निर्माण हेतू ही वैविध्यपूर्व आहे. प्रामुख्याने धार्मिक कारणासाठी वास्तू निर्मिती झाल्याचे लक्षात येते. धार्मिक परंपरा अबाधित ठेवण्यासाठी श्रध्दा आधि श्रध्दास्थाने निर्माण झाली. एवढेच नव्हेतर जलस्थानांना देखील पवित्र मानून तीर्थ म्हटले जाऊ लागले. पूजा, भक्ती, ईश्वरांपासना व तीर्थाटन या बाबींना जीवनात महत्वाचे स्थान निर्माण झाले आहे.

प्राचीन काळापासून ''शिवोपासना'' हिंदू धर्म व संस्कृतीचा केंद्रस्थान आहे. हिमालयापासून ते कन्याकुमारी पर्यंत असणाऱ्या प्रत्येक गावात व स्थळावर शिवाची उपासना म्हणून त्याचे प्रतिक ''लिंगपिंड'' याची पूजा केली जाते. शिवोपासनेत केवळ लिंगपूजा प्रमाणभूत मानली जाते. हिंदू धर्मात विविध देवदेवता आहेत. या देवदेवतांच्या मुर्ती निर्मान करण्याची परंपरा सिंधू संस्कृतीपासून सुरु होऊन ती आजतागायत पर्यंत जोपासली जाते. भग आणि लिंग हे शक्ती आणि शिवाचे प्रत्यक्ष प्रतिक होय. लिंगपूजेचा विकास विष्णू पूजेपासून झाला आहे. जगाच्या कानाकोपऱ्यात वासना व प्रजनन या दोन कारणामुळे लिंग पूजेचा प्रसार झाला होता. डॉ. जितेंद्रनाथ बॅनर्जीच्या मते ''मानव व लिंगरुपाने शिवाची पूजा एकाचवेळी सुरु झाली. आज ही भारतात बारा ज्योतिर्लिंग आहेत. दगड, माती, काष्ठ, अष्टलोह, रत्ने व मणी इत्यादी माध्यमांनी शिवलिंगे तयार करीत विष्णुधर्मातिल पुराणानुसार लिंगाचे भोगपीठ, भद्रपीठ व ब्रम्हपीठ असे प्रमुख तीन भाग पडतात. आज भारतातील बारा त्योतिर्लिंगापैकी महाराष्ट्रात पाच ज्योतिर्लिंग आहेत. ज्योतिर्लिंग म्हणजे प्रकाश किंवा तेज. शिवपूजा ज्योतिर्लिंग पूजनाद्वारे संपन्न होते. प्राचीन तैतरी मोपतिषदामध्ये बारा ज्योतिर्लिंग सांगितली आहेत या तत्वांनाच ज्योतिस्वरुप किंवा ज्योतिर्लिंग म्हणजे आहे. ज्योतिर्लिंग हे महादेवाचे, शिवाचे प्रतिक आहेत.नेपाळमध्ये पशुपतीनाथ व भारतात एकुण बारा ज्योतिर्लिंग आहेत. या सर्व लिंगाचे महात्म्य आपल्या जीवनात अनन्य–साधरण आहे. ज्योतिर्लिंग ब्रम्हा–विष्णु–महेश या तीन देवांशी मानवी जीवन जोडण्याचा प्रघात रुढ आहे. यात महेश म्हणजे शिव हे लयाचे प्रतिक मानले जाते. महेश किंवा शिवसांभ हा देव भक्तास सहज पावतो. तो लवकर संतुष्ट होणारा आहे. शिव तमोगुनी व प्रलयंकारी असून सृष्टीचा संहारक आहे. शिवाच अंग उघड असून भस्म धारण करणाऱ्या या देवाचे भैरव हे सेवक आहेत. लयाचे दुसरे नावं शिव आहे. म्हणून भुतलावर शिवोपासना करावयाची झाल्यास ज्योर्तिलिंगाची पूजा करावी लागते. ब्रम्ह, माया, जीव, मन, बुद्धी, चिल, अहंकार, वायू, आकाश, अग्नी, जल व पृथ्वी ही बारा तत्वे सांगितली आहेत. या बारा तत्वांना पुढे बारा ज्योतिलिंग स्वरुप प्राप्त झाले आहे. शाळुंका ही यज्ञदेवी असून लिंग हे यज्ञ शिखेंच प्रतिक आहे. भारतात अशी अडूसष्ट लिंगे आहेत. ही सर्व लिंगे स्वयंभू असल्याचे मानले जाते. महाराष्ट्रात विशेषतः मराठवाड्यात तीन ज्योतिलिंग आहेत. डोंगर कपारीत, दऱ्या खोऱ्यात हजारो शिवमंदिरे व शिवलींगे आहेत. या ज्योतिलिंगाशी निगडीत असून असंख्य आख्यायिका व ऐतिहासीक घटनांचा संबंध यांच्याशी आहे.

महाराष्ट्रातील पाच ज्योतिर्लींग वास्तुशास्त्र व मुर्तिशिल्याच्या दृष्टीने महत्वपूर्ण व प्रत्ययकारी आहेत सर्वच मंदिराचे वास्तूशिल्प व मूर्तिशिल्प साधारणतः हेमाडंपशी धाटणीचे आढळतात. इ.सवी सनांच्या प्रारंभापासून ते चौदाव्या शतकापर्यंत महाराष्ट्राच्या भुमीवर सातवाहन, वाकाटक, पूर्व चालुक्य, उलट चालुक्य, राष्ट्रकूट, कदंब, शिलाहार व यादवांचे राज्य होते. अनेक शिलालेखामधून तत्कालीन राजा व वंशाचे नाव उल्लेखीत केलेले आहेत. काही राज घराण्यांनी मंदिर निर्माण व मंदिरांना दानधर्म दिल्याचे दिसून येते दान करणे पूण्य कर्म समजा जात असे, संस्थाकडून व राजाज्ञामुळे मंदिर व्यवस्थापणाकरिता आर्थिक मदन



मिळत होती. दिव्यासाठी व इतर खर्चासाठी मदत दिली जात असे. महाराष्ट्रात राज घराण्यातील सम्राटांनी कला, वास्तुकला आणि मुतिकलेला फार मोट्याप्रमाणात राजश्रय दिला. त्यामुळे या काळात कला, वास्तूकला आणि मुर्तिकलेचा मोठा विकास झाला. या काळातील महाराष्ट्र पाच ज्यातिर्लीगाची वास्तू व मुर्तिकला आजही चांगल्या अवस्थेत आढळते.

### 1. ज्योतिर्लिंग परळी – वैजनाथ :–

महाराष्ट्रातील बीड जिल्ह्यात परळी येथील वैजनाथ मंदिर प्रसिद्ध असून भारतातील 12 ज्योतिर्लिंगांत परळीच्या वैजनाथ ज्योतिर्लिंगाचे स्थान जागृत समजले जाते. परळी हे स्थान वैजनाथ मंदिरामुळे परळी वैजनाथ या नावाने ओळखले जाते. वैजनाथ हे ज्योतिर्लिंगाच्या यादीमध्ये 5 व्या क्रमांकाचे आहे. वैजनाथ हे ज्योतिर्लिंगापैकी प्राचीन काव्य स्थान समजले जाते. प्राचीन काव्यानुसार वैद्यनाथाचे प्राचीन नाव 'चिडाभूमी'[1] असे आहे. परळी वैजनाथचे भौगोलिक स्थान 24 29 33 मिनिटे उत्तर अक्षवृतापासून ते 86 42 मिनिटे पूर्व रेखा वृतापासून आणि 24 29 33 मिनिटे उत्तर अक्षवृतापासुन ते 86 42 मिनिटे रेखावृत्ता पर्यंत आहे.[2] परळी हे एक बीड जिल्ह्यातील महत्वाचे शहर आहे. या ठिकाणी शिल्पकलेचे दालन असलेले आपणाला दिसुन येते. येथे परळी या ठिकाणी जाण्यासाठी रेल्वे, मोटार अशा साधनाचा लोक दळणवळणासाठी उपयोग करतात. एस. जी. जाधवांच्या मते, ''दक्षिण–मध्य लोहमार्गावरील स्थानक तसेच मनमाड–पूर्व जंक्शन परळी असे येथे लोहमार्गाने जाता येते.[3] येथे औष्णिक विद्युत केंद्र असल्याने परळी हे गाव अनेक मार्गांना जोडलेले आपणाला निदर्शनास येते. अशा या परळी शहराला सांस्कृतिक व ऐतिहासिक इतिहास लाभलेला दिसतो. या ठिकाणी देशातील बारा ज्योतिर्लिंग आहे.

परळीचे प्राचिन नाव 'पर्यंली' असे होते.[4] येथील ज्योतिर्लिंग हे किंवा मंदिर हे प्राचिन असावे. भारतीय कारण गणनानुसार सात मन्वंतरामधील चार युगात वैजनाथचे नाव वेगवेगळे आहे.[5] जसे. कृतयुगात–'जयंतीक्षेत्र', त्रेतायुगात–''वैजयंती क्षेत्र'', द्वापरयुगात–''मध्यरेखा कांतीपुरा क्षेत्र'' व कलियुगात (चालु) ''पर्यंली'' (परळी) क्षेत्र आहे. परळी हे ठिकाण आज अंगाजोगाई पासून 25 कि. मी. अंतरावर आहे. तर परभणी पासून 60 कि.मी. अंतरावर आहे.

### 2. वैजनाथ मंदिर निर्मितीच्या कथा :

परळीसारखीच औंढा नागनाथ व घृष्णेश्वर ही मराठवाड्यात ज्योतिर्लिंग आहेत. ही ज्योतिर्लिंगे निर्माण कशी झाली,'' शिवमुर्तीचा हा प्रकार दक्षिणेत लोकप्रिय होताच पण उत्तरेतही तो चांगलाच पसरला होता. लिंगोदभववच्या कथेचे पडसाद स्ववत (पाकिस्तानचा उत्तर–पश्चिम कोपरा) च्या काही लोक कथातही मिसळतात. ही कथा लिंगपुराणाच्या पूर्वार्धात विस्ताराने पाहता येते.[6] थोडक्यात सांगावयाचे म्हणजे ब्रह्मदेव आणि विष्णु हे दोघे स्वतःला श्रेष्ठ समजुन भांडू लागले. अकस्मात त्या दोघामध्ये विस्तवाने धगधगनारे एक लिंग प्रगट झाले. त्यांच्या मुळाचा व उंचीचा मागमूस लागत नव्हता स्वतःला श्रेष्ठ समजनारे दोघेही याचा पता लावण्यासाठी निघाले. हंसाचे रुप धारण करुन ब्रह्मदेव वर गेला आणि वराहाच्या रुपाने विष्णुने खालची वाट धरली दोघेही खुप भटकले व तसेच परत आले एका एकी प्रणवाचा नाद उमटला, हेच शिवाचे स्वरुप होय. दोघेही त्याला शरण गेले व क्रमाणे उजवी व डावीकडे हात जोडून उभे राहिले.

अशा प्रकारे भारतातील जी बारा ज्योतिर्लिंगे निर्माण झाली त्यांच्या निर्मितीची कथा आपणला लिंगपुराणात प्रामुख्याने पाहवयास मिळते. ज्योतिर्लिंगाच्या अनेक अशा कथा समाजात प्रसारीत झाल्या आहेत. हे सत्य नाकारता येत नाही त्याचे अपत्य परळी हे ज्योतिर्लिंग आहे. असे समाज मानतो. वैद्यनाथेश्वर ज्योतिर्लिंगाबद्दल शिवपुराणात एक कथा येते.[7] ती अशी राक्षसराज रावण मोठा अभिमानी व अहंकारी असून कैलास पर्वतावर शिवांची आराधना करीत होता. शिव प्रसन्न होत नाही. म्हणुन तप आणखी उग्रतेने सुरु केले तरी भगवान शिव प्रसन्न होत नाही म्हणुन विधिपूर्वक शिवाची पूजा करुन त्याने आपले एक एक मस्तक कापुन वाहिले जेंव्हा रावणाचे एकच शिर उरले तेंव्हा भगवान शंकर त्याच्यावर प्रसन्न होऊन प्रकट झाले. त्यांनी त्याची सर्व मस्तके नीट बसवून दिली. भगवान शिवाला नतमस्तक होऊन रावण म्हणाला,'देवेश्वरा प्रसन्न व्हावं, मी आपणास लंकेत घेऊन जाऊ इच्छितो, आपण माझा मनोरथ पुर्व करावा.मी आपणास शरण आलो आहे.' 'राक्षसराज, तु माझ ऐक माझ्या लिंगास तू घरी घेऊन जा. पण जेंव्हा तू ते भूमीवर ठेवशिल तेंव्हा ते त्याच जागी स्थिर होईल. आता तुझी इच्छा असेल तसं तू कर.' रावण ते शिवलिंग घेऊन आपल्या घराकडे निघाला. पण मार्गात त्याला मूत्रोत्सर्ग करण्याची इच्छा झाली. पुलस्त्यनंदन रावण सामर्थ्यशाली असूनही त्याला मुत्राचा आवेश आवरता आला नाही. त्या वेळी तेथे एका गवळयास पाहुन त्याने ते शिवलिंग त्याच्या हातात दिले. व तो मुत्र त्यागासाठी जरा दूर गेला. ते शिवलिंग अतिशय जड असल्याने त्या गवळयास अतिशय भीती वाटली. तेंव्हा त्याने ते पृथ्वीवर ठेवून दिले. त्यावेळी हीरकमय शिवलिंग तेथे स्थिर झाले. त्याचे दर्शन होताच सर्वांना अभीष्ट प्राप्त होते. त्याच्या पापाचा नाश होतो. हेच शिवलिंग 'वैद्यनाथेश्वर' या नावाने प्रसिध्द आहे. ते सत्पुरूषांना भोग व मोक्ष देणारे आहे.

भगवान शिवाकडुन उत्तम वर मिळवून रावण एकटाच घरी गेला व त्याने सर्व असुरांना व पत्नी मंदोदरीस ही सर्व हकीगत सांगितली. त्या सर्वांचे मन शिवलिंगाशी एकनिष्ठ बनले. त्यांनी त्या शिवलिंगाची विधिपूर्वक पूजा करुन त्याला 'वैद्यनाथ' असे नाव दिले.

### 3. वैजनाथ मंदिराची निर्मिती :

परळी वैजनाथ मंदिराची निर्मिती केंव्हा झाली याबद्दल ठोस पुरावा उपलब्ध होत नाही. पण मु. ग. फणसे म्हणतात, ''राष्ट्रकुट काळात परळी द्वारे हे प्रथमतः निदर्शनास आले. परळी हे तालुक्याचे ठिकाण आहे येथील वैद्यनाथ मंदिर हे आद्य ज्योतिर्लिंग समजले जाते. पानसे यांच्या मते हे आति प्राचिन मंदिर आसून हे एका शिलालेखावरुन स्पष्ट होते.[8] तसेच परळीविषयी जोशी महादेवशास्त्री म्हणतात.'' येथील मंदिरातील यादवकालिन जुना नंदी प्राचीन अवशेषापैकी गणला जातो. येथे शिव–पार्वती यांचा निवास असल्याचे ''जवा आगळ काशी'' असे म्हटले आहे. परळीचे सांस्कृतिक श्रेष्ठत्व हे काशीपेक्षा जवा एवढे का होईना श्रेष्ठ आहे असे दिसते.[9] यावरुन परळी शहराचे महत्व आपल्या लक्षात येते. वास्तविक पाहता शुष्कसांधी मंदिरे भारतात सर्वत्र आढळतात. इतर प्रांतातील अशा प्रकारच्या मंदिराप्रमाणेच महाराष्ट्रातही ह्या मंदिराची कोणत्या तरी आख्यायिकेशी सांगड घातल्याचे दिसते अशी सांगड घातलेली व्यक्ती एकतर स्थपती तरी असते किंवा मंदिर बांधकामाचा आर्थिक भार उचलणारी आश्रयदात्री तरी असते. कर्नाटकात अशा प्रकारच्या मंदिराची सांगड जक्कणाचार्यांशी

घातली जाते. महाराष्ट्रात अशा मंदिरांना हेमांडपंथी संबोधण्यात येते. तर बहुतांशी भारतात पसरलेल्या स्थापत्य परंपरेची सांगड कोक्कसाशी घातली जाते. हेमाडपंती हे विशेषन बऱ्याचदा या मंदिराचे मध्ययुगीन मंदिरापासून वेगळेपण स्पष्ट करते. जामखेडकर म्हणतात, ''बहुतेकदा सज्जापर्यंत दगडी आणि सज्जाच्यावर विटांचे बांधकाम असलेल्या मराठाकालीन मंदिरापासून या मंदिराचे वेगळेपण स्पष्ट करण्यासाठी त्यांना 'हेमाडपंथी मंदिरे ' म्हटली जाऊ लागली''[10] परळी येथील वैजनाथाचे मंदिर यादव काळात निर्माण झाले. यादवाचा प्रधान श्रीकारणाधिप हेमाद्री याने वैजनाथ मंदिराचे बांधकाम केले असे म्हणतात.[11] पुण्यश्लोक राणी आहिल्याबाई होळकरांनी या मंदिराचा जीर्णोध्दार केला हे मंदिर चिरेबंदी असून भव्य स्वरुपाचे आहे. वैजंनाथ मंदिर केंव्हा निर्माण झाले याचा स्पष्ट उल्लेख सापडत नाही. आहिल्याबाई होळकरांचा एक शिलालेख सापडला असून पूर्वेकडील जुन्या घराच्या दगडावर शके 1108 अशी नोंद आहे. हा शिलालेख 1784 रोजी या वैजेनाथाच्या मंदिराचा जिर्णोध्दार केला असा उल्लेख आढळतो तसेच या ठिकाणी दिपमाळ उंच आकाशात झेपावत जाण्याची पाहवयास मिळते.

### 1.) पदविन्यास :—

परळी या शहराच्या दक्षिण दिशेला 'वैजनाथ मंदिर स्थित असून हे मंदिर आकाराने मोठे आहे. या मंदिराचा पदविण्यास वैशिष्ट्येपूर्ण असून हे मंदिर पूर्वाभिमुख आहे. तसेच दक्षिणेकडूनही या मंदिराला जाता येते. वैजनाथ मंदिराची उभारणी जमीनीपासून साधारणतः 70—80 फुट उंच असलेल्या जगतीवर (चौथरा) केली आहे. हा चौथरा जाणवत नाही कारण उंच भूमीवर या मंदिराची रचना केलेली आहे. वैजनाथ मंदिराचा आकार चौकोणी असून आकारानुसार मंडप सभामंडप यांची रचना झालेली आहे. या मंदिराचा पदविण्यास[12] पानगाव व धर्मपूरी येथिल विठ्ठल मंदिराच्या पदविण्यास यामध्ये साम्य आहे. पण कळश उंच झेपावणारे आहे, आकाराने मोठे आहे, या मंदिराच्या पदविण्यासात मुख्य मंडप, मंडप, दोन अर्धमंडप, अंतराळ गर्भगृ व स्तंभ असा वैजनाथ मंदिराचा पदविण्यास आहे. या मंदिराची पूर्व—पश्चिम लांबी 90 फुट आणि दक्षिण—उत्तर रुंदी 26 फुट इतकी आहे. या मंदिराच्या कोनाकृती भिंती पायापासून वरपर्यंत ठाशीवपणे चढत गेलेल्या आहेत. त्यामुळे मंदिराचा आकर्षकपणा व कलेचा विकसित नमुना लक्षात घेण्यासारखा आहे.

### 2.) मुख्यमंडप :—

मुख्यमंडप म्हणजे प्रवेशद्वार होय. या मंदिराचा मुखमंडप पूर्वाभिमुख असून उत्तर व दक्षिण बाजूनेही मंदिरात प्रवेश करता येते. मुखमंडपाला संरक्षणाच्या दृष्टीने मोठे—मोठे दोन प्रवेशद्वार पूर्व आणि उत्तर दिशेला निर्दशनात येतात. या प्रवेशद्वाराची उंची 20 व रुंदी 5 फूट इतकी आहे हे प्रवेशद्वार आकर्षक अलंकरण व फुलांच्या पल्लवीने, लाकडी अलेकरणाने सजाविण्यात आले आहेत. या पूर्वाभिमुख व उत्तराभिमुख प्रवेशद्वारातून प्रवेश केल्यास मुख मंडपात जाता येते. मंदिर बांधकामाच्या दृष्टीने मुख्यमंडपातून प्रवेश केल्यावर लकडी अलंकरण पाहावयास मिळते. मुखमंडपावर दगडीही कलाकुसर जाणवते. जसे संरक्षण ओट्याच्या बाध्य भागावर कोरीव काम आणि विविध प्रकारची शिल्पे आढळतात. पण शिल्परचना कमी दिसून येते.

### 3.) लाकडी मंडप :—

वैजनाथ मंदिराचा लाकडी मंडप इतर मंदिराच्या तुलनेत वैशिष्ट्ये पूर्ण आहे. सभामंडाला छताचा आधार या लाकडी मंडपाच्या बांधकामाने प्राप्त झाला आहे. त्यामुळे सभामंडप आकाराने लहान व लाकडी मंडप मोठ्या आकाराचा आहे. लाकडी मंडपाची पूर्व—पश्चिम लांबी 11 फुट आणि दक्षिण उत्तर रुंदी 44 फुट इतकी आहे. वैजनाथ मंदिरातील लाकडी अलंकरण इ.स. 1885 मध्ये झर रामराव शिवाजी उर्फ नानासाहेब व लोकांच्या सहकार्याने सभामंडप निर्माण करण्यात आले.[13] हा लाकडी सभामंडप टिकवुड सागवानाने बनविण्यात आला आहे. योजनापूर्ण, अलंकृत, टिकावू स्वरुपाचा हा लाकडी सभामंडप असून यामुळे मंदिराला शोभेचा आकार प्राप्त झाला आहे. याच्या निर्मितीसाठी मोठ्या लाकडी खांबाचा वापर करण्यात आला आहे. हे उंच दिसतात. त्याची लांबी साधारणतः 20—30 फुट इतकी आहे. लाकडी खांब त्या संपूर्ण लाकडी गवाक्ष व अलंकरणाला आधार देतात. पण खालच्या बाजूस दगडी बांधकाम जे पूर्ण मंदिराचे होते त्याचा उपयोग करुन ही लाकडी साजसजावट निर्माण झाली आहे. या लाकडी मंडपातून मंदिराचा सभामंडप अंतराळ व मुख्य गर्भग्रह दृष्टीस पडतो. लाकडी मंडपात वर पाहल्यास एकुण 60 गवाक्ष दृष्टीस पडतात. गवाक्षाचा आकार 5 ग 3 फुट इतका आहे. चारी बाजूस गवाक्षामुळे लाकडी मंडप शोभायमान दिसते. पूर्व प्रवेशद्वाराचा सभामंडपाचा आधर लाकडी मंडप तयार करण्यासाठी घेतलेला आहे. लाकडी मंडपात आधार स्तंभावर नाही तर येथील आडव्या तुळयावर हा मंडप आधाभूत आहे. लाकडाने आकर्षकपणा व साचेबद्धपणा मंदिराला साजेसा आकार प्राप्त करुन दिला आहे.

### 4.) सभामंडप :—

वैजनाथ मंदिरातील सभामंडप 18 ग 18 फुट लांबी व रुंदीचा आहे. या मंडपात एकूण तिन्ही बाजूने प्रवेश करता येतो. खालचा भाग गुळगुळीत आहे. येथे मंडपाला अर्धमंडप जोडण्यात आले आहे. सभामंडपात एकूण 16 स्तंभ आहेत. हे स्तंभ छताला आधार देणारे आहेत. 12 स्तंभावर अलंकरण करण्यात आलेले आहे. प्रवेशद्वाराच्या स्तंभावर संरक्षक व विविध वेलेयुक्त अलंकरण पाहावयास मिळतात. स्तंभावर नक्षीकाम तेवढ्या चांगल्या प्रकारचे आढळत नाही. मंडपाच्या मध्यभागी स्तंभ नाहीत पूर्ण छत चारही बाजूने असणाऱ्या स्तंभावर आधारलेला आहे. स्तंभावर किर्तिमुख कलाकृती आढळते. स्तंभ चौकोनी आकाराचे आहेत. त्त्राचा घेर आकार 1.5 ग 1 फुट इतका आहे. तर 10 स्तंभाची लांबी 10 फुट आणि तर 4 स्तंभाची लांबी 8 फुट इतकी आहे. संपूर्ण सभामंडपाचे छत लाकडाने बनविलेले आहे. येथील ग्रर्भगृह व सभामंडप एकाच पातळीवर असल्याने मंदिरात प्रवेश करताच शिवलिंगाचे दर्शन होते.[14]

### 5.) अर्धमंडप :—

वैजनाथ मंदिराचा अर्धमंडप दक्षिण व उत्तर बाजूस मंडपाच्या लगत आलेला आहे. दोन्ही अर्धमंडपाची लांबी व रुंदी 4 ग 4 फुट

इतकी आहे. अर्धमंडपामुळे मंदिराला आकर्षकपणा आला आहे. अर्धमंडपात मध्यभागी विशिष्ट जागा सोडण्यात आली आहे. दोन्ही बाजूला बसण्यासाठी उंचवटा निर्माण करण्यात आला आहे. मुखमंडपाशिवाय या दोन्ही अर्धमंडपातूनही मंडपात प्रवेश करता येतो. हे दोन्ही प्रवेशद्वारमंडप आहेत. अर्धमंडपाच्या दोन्ही बाजूनी बांधलेली अर्धभिंत तिरकस असून तीव्र उचलल्यासारखी वाटते. इतर रचनेच्या तुलनेत अर्धमंडप व त्यांचे स्तंभ लहान व नक्षीकाम नसलेले आहेत स्तंभाची लांबी–रुंदी 6 x 2 फुट इतकी आहे. त्यावर छत दगडी जाणवतो मंदिराला अर्धमंडप आधारभूत असण्याचे दिसते.

## 6.) अंतराळ :–

मंदिराच्या गर्भग्रहाच्या मध्ये अंतराळ आलेले असते.[15] अंतराळाच्या प्रवेशद्वाराच्या दोन्ही बाजूस खांबावर आकर्षक मुर्तिशिल्प आहे. या मंदिराला चौकोनी अंतराळ असून दक्षिण व उत्तर भिंतीत दोन कोनाडे (देवकोष्ट) आहेत. दोन स्तंभ आणि भिंत उभारुन अंतराळ मंडपापासून वेगळे केले आहे. अंतराळाच्या छतावर अलकरण व कलाकृती आढळतात. वैजनाथ मंदिराच्या अंतराळाचे जे प्रवेशद्वार आहे. त्यावर असलेल्या द्वारपट्टीवर मध्यभागी गजलक्ष्मी असून त्याची रचना येथील वैजनाथ मंदिराला शोभायमान आहे. द्वारपट्टी ही कोरीव काम युक्त आणि शिल्पांकृत आहे.

## 7.) गर्भगृह :–

शिव म्हणजे भद्र. चांगले, सुखी शंकर[16] इत्यादी अर्थाने नावे मिळतात. महादेवाचे प्रतिक म्हणून शिवपिडांची स्थापना या गर्भगृहात केलेली आहे. वैजनाथ मंदिराच्या गर्भगृहाची लांबी व रुंदी 6 x 4.5 फुट इतकी आहे. शिवपिंड गर्भगृहाच्या मध्यभागी स्थीत आहे. प्रवेशद्वारावरील दोन स्तंभ मंदिराच्या गर्भगृहाला आधार देतात. गर्भगृहाच्या दाराशी उजव्या बाजूस पार्वतीची पाषाणाची रेखीव मूर्ती आहे इथेच शंकर–पार्वतीसह निवास करतात. म्हणून या क्षेत्राला काशीपेक्षा जगभर श्रेष्ठ असे संबोधले जाते.[17] मंदिरात गर्भगृहात वैद्यनाथाची हातभर उंच व दोन हात व्यासाची शालीग्रामाची पिंड पाषाणाची आहे. शिवपिंडाचा साळुंखा 3.5 फुट लांबी व 1.5 फुल रुंदीचा आहे. शिवलिंगाच्या निर्मितीविषयी नी.पु.जोशी म्हणतात. ''दगड, माती, काष्ठ, अष्ट, लोह, रत्ने, मणि इत्यादी निरनिराळ्या माध्यमांनी शिवलिंगे तयार करीत. याशिवाय अपराजित पृच्छेमध्ये तत्कालिक माध्यमे म्हणून कुंकु, कापूस वैगेरेचाही उपयोग करीत असत. याशिवाय नमदेत मिळणारे मोठे गुळगुळीत दगड बाण लिंगे म्हणुन पुजले जातात.''[18] अशा प्रकारे ही ज्योतिर्लिंगे बनवली जातात. अशाच पाषाणाची पिंड ही परळी येथे आहे. मंदिर सर्व काळ्या पाषाणांनी बनविलेले असून गर्भगृहाच्या उत्तरेकडील भिंतीत एक लहान गोरची चीप बसविली आहे. ती अहिल्याबाईनी बसविण्याचे सांगतात. मंदिराचा घुमट हा पाषाणाचा आहे. या मंदिराच्या परिसरात अनेक लहान–लहान शिवमंदिरे आहेत.

## 8.) स्तंभ रचना :–

वैजनाथ मंदिरात एकुण 32 स्तंभ आहेत. या 36 स्तंभावर मंदिराचा छत आधारलेला आहे. 8 स्तंभ अर्धमंडपात व 14 स्तंभ लाकडी मंडपात असून इतर स्तंभ भितीत समाविष्ठ झालेले आहेत. काही द्वारस्तंभात वापरण्यात आलेले आहेत. दक्षिण व उत्तर दिशेला असणारे चार–चार स्तंभ अर्धमंडपात स्पष्टपणे दृष्टीस पडतात. स्तंभाची लांबी 6 फुट इतकी आहे. तर इतर स्तंभ कमी अधिक उंचीचे साधारणतः 10–12 फुट उंचीचे आढळतात, लाकडी मंडपातील चार स्तंभ हे अत्यंत सुंदर असून स्तंभावर स्तंभशिर्ष त्यावर नागमुखे कोरविलेली आहेत. स्तंभाशिर्षाचा आकार स्तंभरचनेला साजेसा असा आहे. स्तंभ चौकोनी निमुळता जाणारी असल्याने मंदिराला आकर्षक बनवितात.

## 9.) बाहयांग :–

वैजनाथ मंदिराच्या बाघ्य भिंतीवर आकर्षक मुर्तीशिल्प आढळत नाहीत. पण कमी–अधिक प्रमाणात मंदिराला आकर्षक बनविण्याकडे लक्ष देण्यात आले आहे बाघ्य दोन्ही कोणाडे कोनाकृती आहेत. बाघ्यभिंतीवर लहान– लहान हली कोरविण्यात आलेले आहेत. मागच्या बाजूस एक देवकोष्ठक असून त्यात मुर्ती नाही. संपूर्ण मंदिराला दगडी चिरेबंदी आहे. महाद्वारावर देवाचा चौघाडा आहे. बाघ्य स्वरुपात मंदिर आकर्षक व कलाकृतीपूर्ण आहे. मात्र मूर्ती शिल्परचना दृष्टीस पडत नाही.

परळीचे येथील ज्योतिर्लिंग हे किंवा मंदिर हे प्राचीन असावे असे येथील एका शिलालेखा वरुन समजते. पूर्वेकडील एका जुन्या घरच्या दगडावर शके 1108 अशी नोंद आहे. तेथील मंदिरात इंदौरची राणी अहिल्याबाई होळकराचा एक शिलालेख आहे. त्यांनी इ.स. 1784 मध्ये या वैजनाथाच्या मंदिराचा जिणोद्धार केला. हे मंदिर मेरु पर्वतावर असल्याने गावाच्या तुनतेत 70–80 फुट उंच आहे. हे मंदिर पूर्वाभिमुख आहे. मंदिराला तीन बाजूकडून पायऱ्या आहेत. उत्तरेकडील घाटाच्या पायऱ्या वैशिष्ट्यपूर्ण आहेत. प्रत्येक दोन पायऱ्यानंतर एक मोठी चिरेबंदी पायरी खालपासून वरपर्यंत आहे. श्री वैजनाथ मंदिराच्या दक्षिण दिशेला एक हरिहरात्मक तीर्थ (कुंड) आहे. मंदिरांच्या दक्षिणेतून या ठिकाणी जाता येते. संपुर्ण तीर्थाचे निर्माण कार्य एकाच दगडाने झालेले आहे. पुर्व–पश्चिम लांबी 300 फुट व दक्षिण–उत्तर रुंदी 150 फुट इतकी आहे. पायऱ्या उतरुन येथे स्नान करण्यासाठी जाता येते आजही या तीर्थात पाणी आहे.

परळी वैजनाथ येथील मंदिराचा विकास ऐतिहासिक दृष्टया कमी प्रमाणात झाल्याचे निदर्शनास येते. परंतु धार्मिक महत्व अधिक असलेले लक्षात येते. जसे श्रावण, महाशिवरात्री, दसरा या निमित्ताने भक्त किंवा पर्यटक दर्शनासाठी येतात. ऐतिहासिक दृष्टीकोन मात्र या स्थळाबद्दल कमी होत गेलेला आहे. तरीही परळी या ठिकाणी उपलब्ध मुर्तीशिल्पे व मंदिराची रचना वैशिष्ट्यपुर्ण जाणवते. मंदिराच्या सभामंडपातील लाकडी अलंकरण लक्षवेधी आहे. म्हणुन ऐतिहासिक दृष्टीने ही या स्थळाला महत्व प्राप्त झालेले आहे. मंदिरातील स्तंभ रचना व लाकडी अलंकरणाच्या खिडक्या विशेष आकर्षण म्हणता येईल पर्यटकांना त्या साद घालतात. सभा मंडपात लाकडी कामाचा नमुना इतर मंदिरात पाहवयास मिळत नसल्याने पर्यटक येथे येतात. अर्थात परळी नगराला 'जलस्थळ' म्हणुन संबोधले जाते. रेल्वे स्टेशनमुळे या स्थळाला अधिक महत्व प्राप्त झाल्याचे दिसते. बारा ज्योतिर्लिंगापैकी परळी वैजनाथ हे ठिकाण प्रसिध्द आहे. आत ''परळी'' नावाचे महाराष्ट्रात 8 गाव आहेत. यावरून त्याचे महत्व स्थलावरुनही लक्षात येते. हे स्थळ बालाघाटच्या डोंगर रांगावरील असल्याने सह्याद्री पर्वताची डोंगर श्रेणी

म्हणुन भौगोलिक महत्व प्राप्त झालेले आहे.

### *संदर्भ ग्रंथाची यादी*


1. चतुर्वेदी, बी. के., शिवसेना पुराण, डायमंड कप्पा पुस्तके प्रकाशन, प्रथमावृत्ती, 2006. पृ. 42.
2. डब्यु. डब्यु. डब्यु. विकिपीडीया मुक्त ज्ञानकोश, परळी वैजनाथ, 2006. पृ. 1.
3. जाधव, एस. जी., आधुनिक महाराष्ट्राचा इतिहास, संस्कृती प्रकाशन, नांदेड, 2005. पृ. 547.
4. सिंगारे अनिल, धर्मापुरी व पानगावच्या शिल्पकलेचा ऐतिहासिक अभ्यास, अप्रकाशित शोध प्रबंध, टिळक महाराष्ट विद्यापीठ पुणे, 2010. पृ. 30.
5. पोहनेरकर, न. शे., श्री क्षेत्र परळी–वैजनाथ, महात्म्य एवं चित्रमय दर्शन, (अनुवाद– देविप्रसाद शुक्ला, 'हरिवंशाग्रज') श्री वैजनाथ देवस्थान विश्वस्त मंडळ, परळी वैजनाथ, 2002. पृ. 16.
6. लिंगपुराण, पूर्वार्ध, 17,15,92, मनंसुखराय मोर, कलकत्ता संस्करण, 1960. पृ. 40–44.
7. शिवपुराण, प्र. न. जोशी, श्री मनोहर य. जोशी, प्रसाद प्रकाशन, पुणे, प्र, 1982. पृ. 279–280.
8. पानसे, मु. ग., यादवकालीन महाराष्ट्र, मराठी ग्रंथ संग्रहालय, दादर मुबई, 1963. पृ. 119.
9. जोशी महादेवशास्त्र, (संपादक) : भारतीय संस्कृतीकोश, खंड पहिला, पुणे,1985. पृ. 409–410.
10. जामखेडेकर, अ. प्र., स्थापत्य व कला, महाराष्ट्र राज्य गॅझेटिअर, दाशनिका विभाग, सांस्कृतिक कार्य विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई. व्दितीय आवृत्ती. 2009. पृ. 130–131.
11. डब्यु. डब्यु. डब्यु. विकिपीडीया मुक्त ज्ञानकोश, परळी वैजनाथ, 2006. पृ. 1.
12. डॉ. प्रभाकर देव, दि टेंम्पल्स ऑफ मराठवाडा, पब्लिकेशन स्किम, जयपूर, 1993. पृ. 164.
13. पोहनेरकर, न. शे., श्री क्षेत्र परळी–वैजनाथ, महात्म्य एवं चित्रमय दर्शन, (अनुवाद– देविप्रसाद शुक्ला, 'हरिवंशाग्रज') पूर्वोक्त, पृ. 18.
14. सिंगारे अनिल, धर्मापुरी व पानगावच्या शिल्पकलेचा ऐतिहासिक अभ्यास अप्रकाशित शोध प्रबंध, टिळक महाराष्ट विद्यापीठ पुणे, 2010. पृ. 78.
15. कुलकर्णी, र. पु.,(अनु.), शिल्पप्रकाश, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृति मंडळ, मुंबई, 2000. पृ. 22.
16. ओक, ज. वि., (संपा.) गीर्णाव लद्युकोश, संस्कृत–मराठी, कल्पना प्रकाशन प्रा. लि. पुणे, 2002. पृ. 476.
17. सिंगारे अनिल, धर्मापुरी व पानगावच्या शिल्पकलेचा ऐतिहासिक अभ्यास, अप्रकाशित शोध प्रबंध, टिळक महाराष्ट विद्यापीठ पुणे, 2010. पृ. 78.
18. जोशी, नी. पु., भारतीय मूर्तीशास्त्र, महाराष्ट्र विद्यापीठ निर्मिती मंडळ, नागपुर, प्रथमावृत्ती, 1979. पृ. 196–198.

# Publish Research Article
# International Level Multidisciplinary Research Journal For All Subjects

Dear Sir/Mam,

We invite unpublished Research Paper,Summary of Research Project,Theses,Books and Book Review for publication,you will be pleased to know that our journals are

## Associated and Indexed,India

- International Scientific Journal Consortium
- OPEN J-GATE

## Associated and Indexed,USA

- EBSCO
- Index Copernicus
- Publication Index
- Academic Journal Database
- Contemporary Research Index
- Academic Paper Databse
- Digital Journals Database
- Current Index to Scholarly Journals
- Elite Scientific Journal Archive
- Directory Of Academic Resources
- Scholar Journal Index
- Recent Science Index
- Scientific Resources Database
- Directory Of Research Journal Indexing

Golden Research Thoughts
258/34 Raviwar Peth Solapur-413005,Maharashtra
Contact-9595359435
E-Mail-ayisrj@yahoo.in/ayisrj2011@gmail.com
Website : www.aygrt.isrj.org